**विद्यार्थी मित्रहो,**

आपणांस विदित करण्यात येते की, के.सी.ई. सोसायटी संचलित मूळजी जेठा महाविद्यालयाचा **पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ बुधवार, दिनांक १६ सप्टेंबर २०२६** रोजी **के.सी.ई. सोसायटीचे, कान्ह ललित कला केंद्र संचलित महाकवी कालिदास सभागृहात** (एकलव्य क्रीडा संकुल समोर) संपन्न होणार आहे. प्रस्तुत समारंभात पदवी प्रमाणपत्र उपरोक्त दिवशी पात्र विद्यार्थ्यांना विद्याशाखानिहाय पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने संबंधित विद्यार्थ्यांनी कृपया खालील सूचनांचे अवलोकन करावे.

१. बुधवार, दि.१६ सप्टेंबर २०२६ रोजी **सकाळी ८.०० वाजेपासून** विद्यार्थ्यांना त्यांच्या **विद्याशाखेनिहाय** पदवी प्रमाणपत्र वितरीत केले जातील. विद्यार्थ्यांच्या सोयीच्या दृष्टिने मुख्य इमारतीमधील कार्यालयाच्या खिडकी क्र. १ ते ५ वर प्राप्त होतील. त्याची सूची मुख्य इमारतीसमोर प्रदर्शित करण्यात येईल. तसेच ती संकेतस्थळावरही उपलब्ध असेल.

२. पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचा कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी अर्थात सकाळी १०.३० वाजता पदवी प्रमाणपत्रांचे वाटप बंद करण्यात येईल व कार्यक्रम संपल्यानंतर संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत पदवी प्रमाणपत्रांचे वाटप केले जाईल. प्रत्यक्ष पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ सुरू असतांना कोणालाही पदवी प्रमाणपत्र वितरीत केले जाणार नाही.

३. विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी महाविद्यालयाचे ओळखपत्र / आधारकार्ड / पॅनकार्ड / बँकेचे पासबुक / स्वतःचे नांव व छायाचित्र असलेले तत्सम दस्तऐवज दाखविल्यानंतरच त्यास आपले प्रमाणपत्र प्राप्त करून घेता येईल.

४. **ओळख दर्शक पुरावा नसल्यास विद्यार्थ्यांना त्यांचे प्रमाणपत्र दिले जाणार नाही.** तसेच एखादा विद्यार्थी अनुपस्थित असल्यास त्याचे आई-वडील /जवळचे नातेवाईक / शिक्षक किंवा तत्सम अन्य व्यक्तीस पदवी प्रमाणपत्र दिले जाणार नाही, पदवी प्रमाणपत्र घेण्यास स्वतः विद्यार्थी उपस्थित असणे आवश्यक आहे.

५. ज्या विद्यार्थ्यांची पात्रता अपूर्ण आहे, अशा विद्यार्थ्यांना प्रस्तुत समारंभाच्या दिवशी त्यांचे प्रमाणपत्र दिले जाणार नाही. त्यांनी पात्रता पूर्ण केल्याचे पत्र सादर केल्यानंतरच त्यांना त्यांचे प्रमाणपत्र मिळू शकेल.

६. समारंभासाठी उपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र घेतांना प्रमाणपत्रासोबत महाविद्यालयाचे उत्तरीय (उपरणे) घेणे बंधनकारक आहे. उत्तरीयसाठी रु.150/- एवढी रक्कम घेण्यात येईल.

७. पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभासाठी उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी विशिष्ट पोशाखाची सक्ती करण्यात आलेली नाही. तथापि विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृती व परंपरेचा सन्मान राखत त्यानुसार स्वच्छ व निटनेटका पोशाख करून उपस्थित राहणे अपेक्षित आहे.

८. जे विद्यार्थी पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभास अर्थात बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी उपस्थित राहणार नाहीत, अशा गैरहजर विद्यार्थ्यांना दि.३१ म र्च २०२७ पर्यंत महाविद्यालयातून कार्यालयीन वेळेत त्यांचे पदवी प्रमाणपत्र घेता येईल. मात्र, यावेळीही विद्यार्थ्यांनी स्वतःचा ओळख दर्शक पुरावा दाखविणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या व्यतिरिक्त त्यांचे नातेवाईक किंवा अन्य व्यक्तींना प्रमाणपत्र दिले जाणार नाही.

९. माजी विद्यार्थ्यांनी नांव नोंदणीसाठी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावरील https://forms.gle/GkZxdvHVXmqReDsFA ला भेट द्यावी.

कृपया, सर्व विद्यार्थ्यांनी उपरोक्त सुचनांचे पालन करून पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, ही विनंती.

**(प्रा. बी. एन. केसुर)**
**समन्वयक**
**पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ**

**(प्रा. के. पी. नारखेडे)**
**प्र. प्राचार्य**
**मू. जे. महाविद्यालय (स्वायत्त) जळगाव**